रे. मु. क्र. ०३/२०१३
*(CNR No. MHRG13-000054-2013)*

**: निशाणी ४० वर आदेश :**

१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ मयत झाल्याचे पश्चात वारस सामील करणेस झालेला उशीर माफ करून अबेटमेंटचा हुकुम रद्द होणेस केला आहे. अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल आहे.

२. प्रतिवादींनी अर्जास हरकत घेवुन म्हणणे दिले की, वादीस सदर प्रतिवादी क्र. ४ मयत असल्याबाबत माहिती होती. त्यामुळे अर्जातील नमुद कारण संयुक्तिक नाही. तसेच, प्रतिवादींनी पुढे असेही म्हटले की नमुद मृत्यु दाखल्याची नोंद दिनांक ०२.०६.२०१८ रोजीच घेण्यात आलेली नमुद दाखल्यावरून दिसत आहे. त्यामुळे अर्जात दाखला मिळु न शकल्याचे कारण संयुक्तिक नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. सदर प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक २९.०५.२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. सदर अर्जातील कारण पाहता प्रतिवादी क्र. ४ चे वारसांची पत्ते वेळेत न मिळु शकल्यामुळे वादीस वेळेवर वारस दाखल करता आले नाही. अर्जातील कारण पाहता ते संयुक्तीक आहे. प्रस्तुत अर्ज देण्यास जास्त विलंब झालेला नाही. तसेच प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता दोन्ही पक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण होण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस सामील करणेस झालेला उशीर माफ करून अबेटमेंटचा हुकुम रद्द करणे न्यायाच्या हितास्तव आहे. सबब अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**: आ दे श :**

१. अर्ज वादीने प्रतिवादींना रूपये ४००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ यांचेबाबत झालेला अबेटमेंटचा हुकुम रद्द करण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

श्रीवर्धन. (ए. एम. मुजावर)
दिनांक : ०३.१०.२०१८. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, श्रीवर्धन